## वेचक

### कुरवळ जावळी ग्रामदेवता श्री मानाई देवीचा ७ एप्रिल रोजी वार्षिक जत्रा उत्सव




**चिपळूण (प्रतिनिधी) :** खेड तालुक्यातील कुरवळ जावळी गावातील श्री मानाई देवीची जत्रा ७ एप्रिल रोजी साजरी होणार आहे. सकाळी ८ वाजता मंदिरात स्थापित देवदेवतांची महापूजा, सकाळी ९ ते १० वाजता लाटेची पूजा व लाट पाडणे, सकाळी १० ते १२ वाजता लाटेची मिरवणूक, दुपारी १२.३० ते २ वाजेपर्यंत महाप्रसाद, सायंकाळी ५ ते ६ वाजता लाट बगाडावर चढविणे, रात्री ९.३० ते १०.३० निमंत्रित पालख्यांचे आगमन, स्वागत,पालखी भेट, रात्री १०.३० ते १२ वाजता निमंत्रीत पालख्यांसह श्री मानाई मातेचा छबिना, रात्री १२ वाजता लोकनाट्य तमाशा होणार आहे. तरी यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन कुरवळ जावळी ग्रामस्थ, श्री मानाई देवी देवस्थान कमिटी आणि सभासद व कुरवळ जावळी ग्रामविकास मंडळ मुंबई, पुणे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

### दोणवली ग्रामदेवतेचा उद्या जत्रा महोत्सव

**चिपळूण (वार्ताहर):** तालुक्यातील श्री देवी नवलाई कालकाई ग्रामदेवता दोणवली या देवीचा जत्रा उत्सव रविवार ५ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे. यावेळी अनेक पालख्या दोणवली ग्रामदेवतेला भेटण्यासाठी येणार आहेत. यावर्षी दोणवली ग्रामदेवतेला भेटण्यासाठी श्री देवी नवलाई, वाघजाई ग्रामदेवता पोसरे, श्री कडदोबा कालकाई ग्रामदेवता, मजरेकौंढर नवरतवाडी, श्री मानाई काळीश्री ग्रामदेवता गोंधळे, श्री नागार्जुन ग्रामदेवता कापरे, श्री वरदान ग्रामदेवता रामपूर, चव्हाणवाडी, श्री बाजीबुवा ग्रामदेवता, कालुस्ते या ग्रामदेवता येणार आहेत. श्री नवलाई कालकाई यजमान ग्रामदेवता, दोणवली ही यजमान ग्रामदेवता आहे. कार्यक्रमाची रुपरेषा पुढीलप्रमाणे- रात्री १०.३० वा. आमंत्रित ग्रामदेवतांचे आगमन आणि स्वागत, रात्री ११ वा. ग्रामदेवतांची शोडषोपचार पूजा व पालखी भेट आणि रात्री १२ वा. करमणुकीचा कार्यक्रम होईल. श्री राम नमन नाट्य मंडळ, काडवली गजवाडी येथील कार्यक्रम होणार आहे.

### हनुमान जन्मोत्सवानिमित्त गदा पूजन व महाआरती पार




**चिपळूण (वार्ताहर) :** श्री हनुमान या देवतेमध्ये भक्ती आणि शौर्य याचा संगम आहे. युगानुयुगे ज्या मारुतीरायांचे शौर्याचे प्रतीक म्हणून ओळखली जाते ती म्हणजे त्यांची 'गदा', जिने बलाढ्य असुर, राक्षसांचा संहार करून प्रभू श्रीराम यांना रामराज्याच्या कार्यात योगदान दिले. हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने हिंदू राष्ट्र समन्वय समितीच्या माध्यमातून हनुमंताचे शस्त्र असणाऱ्या गदेच्या पूजनाचा कार्यक्रम चिपळूण येथील वेस मारुती मंदिरात घेण्यात आला. यावेळी अखिल विश्व गायत्री परिवारचे विजय धारवडकर गुरूजी यांनी मंत्रोच्चारात उमेश सकपाळ यांच्या हस्ते गदा पूजन करवून घेतले. यानंतर महाआरती, मारुती स्तोत्र पठण आणि राम नाम संकीर्तन याचबरोबर रामराज्याच्या स्थापनेसाठी सामूहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. यात शेकडो भाविकांनी सहभाग घेतला. हिंदू जनजागृती समिती, शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान, सकल हिंदू समाज, विश्व हिंदू परिषद, रा. स्व. संघ, सनातन संस्था आदी संघटनांचा यात सहभाग होता.

# समुद्र शेवाळ शेतीतून किनारपट्टीला विकासाची नवी दिशा

## शिरगाव कार्यशाळेत डॉ. केतन चौधरी यांचे प्रतिपादन

**रत्नागिरी (वार्ताहर):**

समुद्र शेवाळ शेती ही सागरी परिसंस्थेला पोषक व पर्यावरणपूरक असल्याने भविष्यात किनारपट्टी भागाच्या आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाची ठरणार आहे. या शेतीचा व्यापक अवलंब केल्यास पर्यावरण संवर्धनासह स्थानिकांचा आर्थिक आणि सामाजिक विकास साध्य होऊ शकतो, असे प्रतिपादन शिरगाव येथील मत्स्य अभियांत्रिकी तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. केतन चौधरी यांनी केले.

मत्स्य अभियांत्रिकी तंत्रनिकेतन, झाडगाव, सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र आणि जलजीविका रत्नागिरी (UNDP-GCF प्रकल्प) यांच्या संयुक्त विद्यमाने "समुद्र शेवाळ संवर्धन – सद्यस्थिती आणि भवितव्य" या विषयावर एकदिवसीय विचारमंथन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल पावसे, प्रा. डॉ. आसिफ पागरकर, प्रकल्पाचे जिल्हा समन्वयक ऋषीकेश भाटकर तसेच जलजीविका संस्थेचे चिन्मय दामले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेतील तांत्रिक सत्रांमध्ये तज्ज्ञांनी समुद्र शेवाळ शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि मूल्यवर्धनाच्या संधी यावर मार्गदर्शन केले. गुजरातमधील केंद्रीय मीठ व सागरी रसायने संशोधन संस्थेचे डॉ. वैभव मंत्री यांनी विविध शेवाळ प्रजातींच्या शेती पद्धतींचा तुलनात्मक आढावा सादर केला.

प्रा. डॉ. आसिफ पागरकर यांनी समुद्री शेवाळ प्रक्रिया व नवकल्पनांवर प्रकाश टाकला, तर सिंधुदुर्ग कांदळवन कक्ष प्रतिष्ठानच्या पूजा लोटे यांनी उद्योजकतेच्या संधी स्पष्ट केल्या. गद्रे मरीन एक्सपोर्टच्या प्रेरणा हिरवे यांनी प्रत्यक्ष अनुभव कथन करत या व्यवसायातील शक्यता मांडल्या. तसेच राफटेक सोल्युशन्सचे अक्षय जाधव यांनी उच्च मूल्य उत्पादनांपर्यंतच्या प्रवासाचे मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेमुळे किनारपट्टी भागातील मच्छीमार आणि युवकांसाठी पर्यायी उत्पन्नाचा नवा मार्ग उपलब्ध होणार असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपूर्वा सावंत यांनी केले, तर आभार प्रा. सचिन साटम यांनी मानले.

# उन्हाळ्याच्या तोंडावर जिल्ह्यात पाणी.. पाणी.. करण्याची वेळ

**रत्नागिरी (वार्ताहर):**

जिल्ह्यात पाण्याचे योग्य नियोजन न झाल्याचे परिणाम आता प्रत्यक्ष जाणवू लागले असून, उन्हाळ्याच्या तोंडावरच नागरिकांना 'पाणी पाणी' करण्याची वेळ आली आहे. मार्च महिन्यातच अनेक भागात टंचाईची झळ बसू लागली असून येत्या एप्रिल-मे महिन्यात परिस्थिती अधिक गंभीर होणार असल्याचा इशारा प्रशासनाच्या अहवालातून स्पष्ट झाला आहे.

रत्नागिरी तालुक्यासह चिपळूण, खेड, लांजा आणि संगमेश्वर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाली आहे. वाड्या-वस्त्यांमध्ये महिलांना पाण्यासाठी लांब पल्ल्याचा प्रवास करावा लागत असून दैनंदिन जीवन विस्कळीत होत आहे. मात्र या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडे टँकरसाठी एकही प्रस्ताव नसल्याचे वास्तव समोर आल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कोकण विभागीय टंचाई कृती आराखडा २०२६ नुसार जिल्ह्यात तब्बल ३४३ गावे आणि ८१४ वाड्या टंचाईग्रस्त होण्याच्या मार्गावर आहेत. गतवर्षी पावसाचे प्रमाण घटल्याने जलस्रोत पुनर्भरण कमी झाले असून यंदा टंचाईची तीव्रता गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत सुमारे १० टक्क्यांनी वाढणार असल्याचे अंदाज वर्तवण्यात आले आहेत.

कोकण हा अतिवृष्टीसाठी ओळखला जाणारा प्रदेश असला तरी पावसाळ्यानंतर काही महिन्यांतच जलस्रोत आटण्याची समस्या कायम आहे. जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेली कामे रखडल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. परिणामी, महिलांना घागरभर पाण्यासाठी मैलोनमैल भटकंती करावी लागत आहे.

# रस्त्यावर जखमी अवस्थेत तडफडणाऱ्या श्वानाच्या मदतीसाठी धावले लांजा पोलीस

**लांजा (प्रतिनिधी ):**

पोलीस म्हटले की खाकी वर्दीतील कणखर माणूस डोळ्यासमोर उभा राहतो. सर्वसामान्य माणूस तर खाकी ला कायम घाबरूनच असतो. अशा खाकी वर्दीतील पोलिसांनाही दयामाया असते. मग तो माणूस असो वा प्राणी. याचे जिवंत उदाहरण पहावयास मिळाले ते मंगळवारी दुपारी लांजा शहरात जखमी अवस्थेत रस्त्यावर तडफडत पडलेल्या श्वानाच्या मदतीला धावून गेलेल्या लांजा पोलिसांच्या माध्यमातून.

लांजा शहरात असलेल्या पंचायत समिती कार्यालयासमोर एका जखमी श्वानाची रस्त्यावर तडफड सुरू होती.


शहरात रस्त्यावर जखमी अवस्थेत तडफडत पडलेल्या श्वानाच्या मदतीसाठी थांबलेले पोलीस निरीक्षक निळकंठ बगळे व त्यांचे सहकारी.

अनेक वाहनचालक व पादचारी त्या श्वानाला बघून पुढे जात होते, मात्र त्याच्या अवस्थेकडे कुणाचेही विशेष लक्ष नव्हते. अशा वेळी लांजा पोलीस ठाण्याचे पो.नि. निळकंठ बगळे, सहा. पो. उपनिरीक्षक सचिन भुजबळराव व श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संजय जाधव यांनी ही बाब लक्षात घेत तत्काळ मदतीसाठी धाव घेतली. या तिघांनी रस्त्याच्या मधोमध तडफडणाऱ्या जखमी श्वानाला सुरक्षितपणे बाजूला घेतले आणि त्याच्या अंगावर पाणी मारून त्याला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांनी त्वरित नगर पंचायत प्रशासनाशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. माहिती मिळताच लांजा नगर पंचायतचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि श्वानाला पुढील उपचारासाठी घेऊन गेले. मात्र, सर्व प्रयत्न करूनही त्या श्वानाचा अखेर मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेत मदतीला धावून गेलेल्या पोलिसांच्या माध्यमातून लांजात माणुसकीचे चित्र पहावयास मिळाले.

# गुरुप्रसाद घाडी यांना विद्यावाचस्पती पदवी बहाल

**देवरूख (प्रतिनिधी):**

देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली देवगड महाविद्यालयातील भूगोलशास्त्राचे अध्यापक गुरुप्रसाद एकनाथ घाडी यांनी रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण नगराच्या समस्या आणि संधीः भू-अभिक्षेत्रिय दृष्टिकोन या विषयावरील संशोधन प्रबंध सादर केला. मुंबई विद्यापीठाने त्याला मान्यता देत त्यांना नुकतीच विद्यावाचस्पती पदवी प्रदान केली. श्री. घाडी यांनी चिपळूण नगर आणि नगराच्या सभोवतालच्या सुमारे १६ गावांमधील आपले संशोधन पूर्ण केले आहे.


मार्गदर्शक डॉ. पाटील यांच्याकडे संशोधन प्रकल्प सादर करताना श्री. घाडी.

भूमी उपयोजन व भूमी आवरण, चिपळूण नगर आणि सभोवतालच्या प्रदेशाच्या समस्या, चिपळूण नगरातील पाणी गुणवत्ता विश्लेषण, चिपळूण नगरातील लोकांचा नगराच्या विकासाविषयी असणारा दृष्टीकोन, शाश्वत विकास ध्येयांचा विचार करता चिपळूण नगर आणि परिसराची स्थिती, चिपळूण नगर आणि परिसरातील घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, जलप्रक्रिया केंद्र, भविष्यकालीन वसाहती व पार्किंगसाठी आवश्यक भूभाग इत्यादीचे स्थान सुयोग्यता विश्लेषण (Site Suitability Analysis) आणि चिपळूण नगराचा शाश्वत विकास होण्यासाठी उपाययोजना इत्यादी प्रकरणांची मांडणी आपल्या संशोधनात केली आहे.

# जाणता राजा ग्रुप लांजाच्यावतीने आज मिनी शुटिंग व्हॉलिबॉल स्पर्धा

**लांजा (प्रतिनिधी)-**

जाणता राजा ग्रुप लांजाच्यावतीने आयोजित आणि आमदार किरण सामंत पुरस्कृत भव्य मिनी शुटींग व्हॉलिबॉल स्पर्धा शनिवार दिनांक ४ एप्रिल रोजी लांजा येथे होणार आहेत.

शुटिंग व्हॉलिबॉल क्रीडा बांधवांमध्ये एकता आणि क्रीडा प्रेम वृद्धिंगत व्हावे या उद्देशाने आयोजित केलेल्या आहे. या मिनी शुटिंग व्हॉलिबॉल स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी सायंकाळी ६.३० वाजता आमदार किरण सामंत यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी लांजा नगराध्यक्षा सावली कुरूप, उपनगराध्यक्ष मिलिंद उर्फ बाबा लांजेकर, गटनेता योगेश कावतकर, लांजा तहसीलदार प्रियंका ढोले, मुद्रांक जिल्हाधिकारी सांगली प्रमोद कदम, लांजा पोलीस निरीक्षक निळकंठ बगळे, लांजा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अभिजीत कुंभार हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ही स्पर्धा गणेश मंगल कार्यालय, जावडे रोड सारस्वत वसाहत लांजा या ठिकाणी होणार असून स्पर्धेतील प्रथम क्रमांक १५, ५५५/- रुपये व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांक ११,१११/-रुपये व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक ७७७७/- रुपये व आकर्षक चषक, चतुर्थ क्रमांक ३३३३/-रुपये व आकर्षक चषक अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. तसेच ,बेस्ट डिगर रोख रुपये ५००/- रुपये व चषक,शूटर रोख रुपये ५००/- व चषक,नेटमन रोख रुपये ५००/- रुपये व आकर्षक चषक अशी वैयक्तिक बक्षीस दिली जाणार आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क मंगेश लांजेकर ९४२३२९६८३०, संजय चव्हाण ९०४९३९७०५१ यांच्याशी संपर्क साधावा.

# ढिसाळ कारभार लपवण्यासाठी कोकण रेल्वे गाड्यांवर खापर फोडण्याचा प्रयत्न

## कोकण रेल्वे प्रवासी संघटनेकडून संताप व्यक्त

**रत्नागिरी (वार्ताहर) :**

मध्य रेल्वेच्या लोकलसेवेचा वारंवार विस्कळीत होणारा कारभार लपवण्यासाठी कोकण रेल्वे गाड्यांवर दोषारोप करण्याचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. कोविड काळात २०२१ मध्ये दादर-रत्नागिरी पॅसेंजर सेवा बंद केल्यानंतरही लोकल गाड्यांचा वक्तशीरपणा सुधारलेला नसताना, त्याचे खापर कोकणच्या गाडीवर फोडले जात असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

कोकण रेल्वे प्रवासी संघटनेचे पदाधिकारी नितीन जाधव यांनी यावर संतप्त प्रतिक्रिया देताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, मध्य रेल्वेच्या नियोजनशून्यतेमुळे लोकल सेवा ढेपाळत असताना त्यासाठी कोकणच्या गाड्यांना जबाबदार धरणे अन्यायकारक आहे.

दरम्यान, दादर-रत्नागिरी पॅसेंजर बंद असतानाच त्याच वेळेत दादरहून गोरखपूरसाठी नवीन गाडी सुरू करण्यात आली आहे. मात्र, कोकणवासीयांच्या अत्यंत महत्त्वाच्या दादर-रत्नागिरी पॅसेंजर सेवेबाबत मध्य रेल्वेचा नकारात्मक पवित्रा कायम असल्याने संतापाची लाट उसळली आहे.

कोकण रेल्वे प्रवासी हक्क कार्यकर्ते अक्षय महापदी यांनीही तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करताना म्हटले की, गेल्या पाच वर्षांत अनेक लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा करूनही मध्य रेल्वेने दादर-रत्नागिरी पॅसेंजर पुन्हा सुरू करण्यास टाळाटाळ केली आहे. हा केवळ प्रवाशांचा नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र आणि लोकप्रतिनिधींचा अपमान आहे.

कोकणवासीयांच्या दैनंदिन प्रवासासाठी अत्यावश्यक असलेली दादर-रत्नागिरी पॅसेंजर सेवा तातडीने पूर्ववत सुरू करावी, अशी ठाम मागणी प्रवासी संघटनांकडून करण्यात येत असून, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये, अन्यथा याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा देत मध्य रेल्वेने तातडीने वास्तव परिस्थितीची दखल घ्यावी, अशी एकमुखी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# उच्चशिक्षणानंतरही बेरोजगारीचा विळखा; पाल्यांसह पालकांमध्येही वाढते नैराश्य

**रत्नागिरी (वार्ताहर) :**

वाढत्या बेरोजगारीच्या गंभीर प्रश्नाचे दूरगामी परिणाम आता केवळ तरुणांपुरते मर्यादित न राहता त्यांच्या पालकांपर्यंत पोहोचत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. उच्चशिक्षित मुलांना नोकरी मिळत नसल्याने पालकांमध्ये नैराश्याचे प्रमाण झपाट्याने वाढत असल्याची माहिती अलीकडील सर्वेक्षणातून उघड झाली आहे. ही बाब समाजाने गांभीर्याने विचारात घेण्याची वेळ आली असल्याचे जाणकारांचे मत आहे.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या पुढाकारातून करण्यात आलेल्या 'लॉन्गिट्युडिनल एजिंग सर्व्हे ऑफ इंडिया' या व्यापक सर्वेक्षणात ४५ वर्षांवरील तब्बल ७३ हजारांहून अधिक नागरिकांचा सहभाग होता. या आकडेवारीचा स्वीडनमधील उमेआ विद्यापीठाच्या संशोधकांनी सखोल अभ्यास केला असून, 'सोशल सायन्स अँड मेडिसिन' या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या निष्कर्षांनी चिंतेची घंटा वाजवली आहे. अहवालानुसार, उच्चशिक्षित मुलं बेरोजगार राहिल्यास त्यांच्या पालकांमध्ये नैराश्य येण्याचा धोका ३.१४ टक्क्यांपासून तब्बल १२.४८ टक्क्यांपर्यंत वाढतो. विशेषतः ज्या कुटुंबांमध्ये पालक आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेसाठी पूर्णपणे मुलांवर अवलंबून असतात, त्या ठिकाणी ही परिस्थिती अधिक गंभीर बनते.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर केवळ रोजगारनिर्मितीच नव्हे, तर शिक्षणव्यवस्था, कौशल्यविकास आणि करिअर मार्गदर्शन यांचा पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित होत आहे. अन्यथा, उच्चशिक्षण घेऊनही भविष्य अंधारात असल्याची भावना तरुणांबरोबरच त्यांच्या पालकांनाही पोखरत राहील, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

# पाली भुवडवाडी येथे उद्या चारगांव प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धा

**चिपळूण (प्रतिनिधी) :**

श्री रामवरदायिनी क्रिकेट क्लब, पुणे आयोजित चारगांव प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धा रविवार ५ एप्रिल रोजी पाली भुवडवाडी येथील मैदानावर खेळविण्यात येणार आहे.

एक महिन्यापूर्वी निरबाडे येथे या क्रिकेट क्लबच्या वतीने संघमालक यांच्या समक्ष लिलाव पद्धतीने संघाची निवड प्रक्रिया करण्यात आली. त्यामध्ये छत्रपती वॉरिअर्स संघमालक- संतोष हुमणे, समर्थ इलेव्हन- नितीन महाडिक, इगल फायटर- दीपक नाकते, रूद्र वॉरिअर्स- रोहन महाडिक, अवनिश सुपर कींग- कुणाल खापरे आणि विहाना इलेव्हन- निशांत मोहीते या सहा संघमालकानी ७२ क्रिकेट खेळाडू यांच्यातून ऑक्शनने आपल्या पसंतीचे खेळाडू घेतले आणि आपला संघ तयार केला आहे. चारगांवमध्ये प्रथमच मोठ्या उत्साहाने व उत्तम प्रकारे क्रिकेट खेळाडूंची निवड प्रक्रिया करण्यात आली. त्याचे कौतुक अनेकांनी केले आहे. ही स्पर्धा श्री रामवरदायिनी क्रिकेट क्लब आणि सर्व संघ मालक यांच्या उपस्थितीत ५ एप्रिल रोजी पाली भुवडवाडी येथील मैदानावर मान्यवर व क्रिकेटप्रेमी यांच्या उपस्थितीत खेळविण्यात येणार आहे. चारगांवातील खेळाडूंना घेऊन ही स्पर्धा चारगांव मर्यादित एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा- चार प्रिमियर लीग अशी पहिल्यांदाच होत असल्याने अनेकांची उत्कंठा वाढली आहे.

चारगाव प्रिमियर लीग या क्रिकेट स्पर्धेचे थेट प्रक्षेपण 'कोकणी मज्जा' या युट्यूब चॅनेलवर प्रेक्षकांना पाहता येईल.

# मंडणगड येथे हास्य योग क्लब उपक्रमाची सुरुवात

**मंडणगड (प्रतिनिधी) :**

ज्येष्ठ नागरिक संघ मंडणगड यांच्या माध्यमातून २ मार्च रोजी शहरातील साईनगर येथील नाना नानी पार्क या ठिकाणी हास्य योग क्लब सुरू करण्यात आला. माजी सभापती व योग अभ्यासक भाई पोस्टुरे यांनी कार्यक्रमास उपस्थित नागरिकांची योग आसने घेऊन योग साधनेची सुंदर माहिती दिली. विजय पोटफोडे यांनी हाता पायाचे, हृदय तंदुरुस्त राहण्यासाठी आवश्यक व्यायाम प्रकार घेतले. तसेच हास्य योगा विषयी माहिती सांगुन हास्याचे विविध प्रकार सांगितले.

यावेळी विजय पोटफोडे, प्रमोद काटकर, अर्जुन भोसले, विनायक पेवेकर, रवींद्र दरीपकर, वैशाली पिंपळे, शुभांगी तोडकर आदी उपस्थित होते. हास्य योग क्लब हा सुंदर उपक्रम शहरात सुरू झाला असून सर्वच वयोगटातील नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन विजय पोटफोडे यांनी केले आहे. नाना-



नानी पार्क साईनगर, मंडणगड येथे रोज सकाळी सात वाजता या उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

## CHANGE OF NAME

**I SANDIP VASUDEV GONBARE** s/o VASUDEV SHIVRAM GONABARE resident of karkarwadi Zombadi Guhagar dist- Ratnagiri 415702 have changed my name from **SANDIP VASUDEV GONABARE** to **SANDIP VASUDEV GONBARE** as per my documents.

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

### ई-निविदा सूचना

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, प्रादेशिक विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव** – कोकण रेल्वेच्या रत्नागिरी विभागांतर्गत आरआरएम कार्यालय, रत्नागिरी येथे विविध क्षमतेच्या 5 स्टार इन्व्हर्टर स्प्लिट एअर कंडिशनिंग युनिट्सचा पुरवठा, उभारणी, चाचणी व कार्यान्वयन करणे. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/1/2026 दिनांक 04/04/2026, अंदाजित खर्च** – ₹ 18,30,440/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 36,600/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 18/04/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी प्रादेशिक विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.

चिपळूण येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर यांचे न्यायालयात, मुक्काम–चिपळूण

## जाहीर नोटीस

अर्जदारतर्फे वकील- श्री. एस. एस. लटके
दिवाणी किर.अर्ज क्र. ३६/२०२६
नेमली ता. ०२/०५/२०२६ निशाणी क्र. ७
CNR- MHRT07000003392026

**सौ. हर्षदा मंगेश आंब्रे, पुर्वाश्रमीची शैला परशुराम साळुंके
उ.व.४३, धंदा- गृहिणी, रा. खालची वाडी, चिरणी, ता. खेड जि. रत्नागिरी** – अर्जदार

**विरूद्ध**

**१) श्री. रूपेश परशुराम साळुंके, वय ४१, धंदा नोकरी,
रा. रूम नं. ४०२, चौथा मजला, आदर्श बिल्डींग नं. ४ दिवा दातिवली, रोड,
साई बाबा मंदिर मौसम थियेटर जवळ, दिवा ईस्ट, ठाणे
२) श्री. कल्पेश परशुराम साळुंके, वय ३४, धंदा नोकरी
रा. सूर्य नगर विटावा, रूम नं. ६, फुलचंद निवास बेलापूर रोड, ठाणे** – सामनेवाले

अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ भाग (VIII) कलम २ प्रमाणे संहिता ऑर्डर १६ नियम १० प्रमाणे

ज्याअर्थी अर्जदार व सा.वाला क्र. १ व २ यांचे वडील कै. परशुराम बाबाजी साळुंके हे दि.१५/१२/२०२१ रोजी रूम नं. ४०३, आदर्श बिल्डिंग, मुंब्रादेवी कॉलनी, दिवा ईस्ट, ठाणे येथे मयत झाले आहेत. कै. परशुराम बाबाजी साळुंके हे मु. पाथे, पो. तळवडे, ता. चिपळूण जि. रत्नागिरी येथे कायमस्वरूपी वास्तव्यास होते. अर्जदार व सा.वाला. १ व २ यांचे वडील कै. परशुराम बाबाजी साळुंके यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार व सा.वाला यांना त्यांच्या शासकीय व निमशासकीय कामकाजाकरीता अर्जदार व सा. वाला हे वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केला आहे. मयत कै. परशुराम बाबाजी साळुंके यांना अर्जदार व सा. वाला यांचे व्यतिरीक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

त्याअर्थी तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, प्रस्तुत कामी अर्जदार व सा. वाला यांना तसा वारस वारस दाखला मिळणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी वरील कोर्टात दि. ०२/०५/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वतः अथवा प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा अर्जदार व सा. वाला यांना तसा वारस दाखला मिळणेस कोणाची काही हरकत नसल्याचे मानून अर्जाचे चौकशीचे काम पूर्ण करणेत येवून अर्जदार व सा.वाला यांना तसे वारस प्रमाणपत्र देण्याबाबत पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी. आज तारीख २७ माहे मार्च सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

तयार करणार

**सही/–
(श्री. व्ही. एम. सोवनी)**
कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, चिपळूण

शिक्का

**सही/–
(सौ. एम. एम. आठल्ये)**
सहा. अधिक्षक (आस्था)
दिवाणी न्यायालय, क.स्तर, चिपळूण

## punjab national bank
Together for the better

### एआरएमबी मुंबई शहर
यूबीआय टॉवर, ६ वा मजला, २५,सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई – ४००००१. ई-मेल : cs6041@pnb.bank.in

### सरफेसी कायद्याच्या अंतर्गत सुरक्षित मत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८(६) वाचल्या जाणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

सूचना ह्याद्वारे सामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार (रां) आणि हमीदार (रां) ना देण्यात येत आहे की खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण होत्या ज्याचा रचनात्मक/ प्रत्यक्ष/ सांकेतिक ताबा बँकेच्या/ सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारी ह्यांनी घेतला असून संबंधित कर्जदार (रां) आणि हमीदार (रां) कडून बँक/ सुरक्षित धनको ह्यांना देय असलेल्या त्यांच्या देण्याच्या वसुलीसाठी येथे खालील कोष्टकामध्ये नमूद करण्यात आलेल्या दिनांकाला "जसे आहे जेथे आहे तत्वावर", "जसे आहे तसे आहे तत्वावर" आणि "जसे आहे जेथे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे. संबंधित मालमत्तेसमोर राखीव मूल्य आणि इसारा रक्कम ठेव नमूद करण्यात आली आहे.

**सुरक्षित मालमत्तेचे वेळापत्रक**

| अनु. क्र | कर्जदार (संस्थेचे नाव)/ सह-कर्जदार/ प्रोप्रायटर/ भागीदार/ संचालक/ हमीदार (रां)/ गहाणदार (रां) ची नावे | गहाण स्थावर मालमत्तेचे वर्णन / मालकाचे नाव (गहाण मालमत्ता) | ए) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना दि. बी) १३(२) अंतर्गत बाकी थकीत रक्कम + व्याज आणि चार्जेस सी) सरफेसी कायदा २००२ च्या कलम १३(४) अंतर्गत ताबा दिनांक डी) ताब्याचे स्वरूपः सांकेतिक/ प्रत्यक्ष/ रचनात्मक | ए) राखीव मूल्य बी) इरठे (शेवटचा दिनांक) सी) बोली वाढ रक्कम | ई-लिलावाचा दिनांक /वेळ | सुरक्षित धनकोला ज्ञात असलेला बोझ्याचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एआरएमबी मुंबई शहर श्री. सुभाष रामचंद्र फणसमकर | एस क्र. ३०१, गट क्र. १९२५-ए/२, (जूना एस क्र. १९२५) बंगला क्र. १९, शांतीनगर, गाव लांझा, तालुका लांझा, जिल्हा रत्नागिरी ४१६७१२ | ए)१५.०९.२०२५ बी) ३१.०१.२०२६ अनुसार रु. १,८५,७२,३९०.७० + त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क सी) दिनांकित : १६.१२.२०२५ डी) सांकेतिक | ए) रु. ९२,८९,०००/- बी) ९,२८,९००/- २८/०४/२०२६ रोजी सायं. ०४.०० वा. पर्यंत सी) रु. २५,०००/- | २८/०४/२०२६ स. ११.०० तर सायं. ४.०० वा. | ज्ञात नाही |

**अटी आणि शर्ती:**

१. विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ अंतर्गत विहित करण्यात आलेल्या अटी आणि शर्तींच्या आधारे आणि त्याशिवाय खालील शर्तींच्या आधारे असेल. २) मालमत्तांची विक्री "जसे आहे जेथे आहे तत्वावर" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" आणि "जसे आहे तेथे आहे तत्वावर" करण्यात येईल. ३) उपरोक्त परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेला तारण मत्तेचा तपशील प्राधिकृत अधिकारी ह्यांच्या कडे असलेल्या सर्वोत्तम माहितीच्या आधारे आहे, परंतु प्राधिकृत अधिकारी सदर घोषणेमधील कोणत्याही त्रुटी, गैर निवेदन किंवा काही गाळलेले असल्यास त्यासाठी जबाबदार राहणार नाहीत. ४) निम्नस्वाक्षरीकारांद्वारे https://baanknet.com संकेतस्थळावर उपरोक्त नमूद केल्यानुसार ई-ऑक्शन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून विक्री करण्यात येईल. ५) विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया www.baanknet.com आणि www.pnbindia.in चा संदर्भ घ्या. ६)संपर्क व्यक्ती – श्री सुशील कुमार – ८४२०१९४६७४, रिझवान अली- ७७६८९४१२५६
७) बोलीदाराला उपरोक्त आयपीपैकी बोली लावत असल्यास त्यांना किमान बोली वाढ रक्कम आणि उपरोक्त निश्चित केलेल्या राखीव मूल्याच्या वर बोली लावावी लागेल.

**सरफेसी कायदा २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत १५ दिवसांची सांविधानिक विक्री सूचना**

दिनांकः ०४.०४.२०२६
ठिकाणः रत्नागिरी

**सही/- प्राधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक**